# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in




## -:प्रेस नोट :-

दिनांक :- १७/०६/२०२६

## "चाळीसगावात स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई : मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघड, दोन आरोपी ताब्यात; तर एका संशयित इसमासह मोटारसायकल देखिल जप्त"

दिनांक १४.०६.२०२६ रोजी चाळीसगाव शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. २८९/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२) अन्वये दाखल असलेल्या मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचा स्थानिग गुन्हे शाखेकडून संमातर तपास सुरु असतांना स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी/अंमलदार यांना गोपनीय माहिती प्राप्त झाली की, चोरीस गेलेली HF डिलक्स मोटारसायकल चाळीसगाव येथील **आरोपी राहुल सुभाष भिसे, रा. हनुमानसिंग नगर, चाळीसगाव** याने चोरी केली आहे.

मिळालेल्या माहितीची खात्री करून राहुल सुभाष भिसे यास ताब्यात घेतले असतां त्यांच्याकडून होंडा युनिकॉर्न मोटारसायकल हस्तगत करण्यात आली. त्याच्याकडे सदर गुन्हयांत चोरीस गेलेल्या HF डिलक्स मोटारसायकलबाबत कैशल्यपुर्ण सखोल चौकशी केली असता, त्याने सदर मोटारसायकल **प्रशांत दीपक राजपूत, रा. हरीगिरी बाबा नगर, पाटणादेवी रोड, चाळीसगाव यास विकल्याची कबुली दिली.** त्यानुसार प्रशांत दीपक राजपूत यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, राहुल भिसे याने सदर मोटारसायकल त्यास २०,०००/- रुपये किंमतीत विकल्याचे निष्पन्न झाले. मोटारसायकलचे आरसी बुक मागितल्यावर राहुल भिसे याने नंतर देतो असे सांगून टाळाटाळ केल्याचेही त्याने सांगितले.

**त्यानुषंगाने सदर गुन्हयांत आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांचेकडून एकूण ८०,०००/- रुपये किंमतीच्या दोन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. सदर गुन्हयांचा पुढील तपासासाठी आरोपी व मुद्देमाल चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास सुरु आहे.**

तसेच दिनांक १४.०६.२०२६ रोजी चाळीसगाव शहरात स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी/अमंलदार यांचेकडून गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग सुरु असताना अहिल्याबाई होळकर चौक परिसरात एक इसम विनानंबर प्लेटची मोटारसायकल घेऊन संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आला. त्यास थांबवून चौकशी केली असता त्याने आपले नाव प्रशांत दत्तात्रय राठोड (वय 27 वर्षे), रा. यशवंतनगर रोड, चाळीसगाव असे सांगितले. त्याच्याकडे असलेल्या मोटारसायकलबाबत विचारपूस केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत.

**त्यानुषंगाने संशयित इसम व त्यांचे ताब्या असलेली एकुण २५,०००/- रुपये किंमतीची यामाहा कंपनीची FZ मोटारसायकल पुढील कायदेशीर कारवाईसाठी चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आली आहे.**

**सदरची कामगिरी मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगाव परिमंडळ, तसेच मा. श्री विजय ठाकुरवाड, उप विभागीय पोलीस अधिकारी, चाळीसगाव विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांचे नेतृत्वात पो.उप-निरी श्री शेखर डोमाळे, पोहेकॉ/लक्ष्मण पाटील, पोकॉ/राहुल पाटील, पोकॉ/भूषण पाटील, सर्व नेम.स्था.गु.शा. जळगाव या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगाव**

**************************************************************************

